**बीसी १२८ एसडीबी २४४०९**
**आरबीआय/२००८-०९/४५२**
**डीबीओडी. क्र. डीआयआर. बीसी १२८/१३.०३.००/२००८ - ०२ एप्रिल २४, २००९**

**सर्व अनुसूचित वाणिज्य बँका**
**(आरआरबी सोडून)**

महोदय,

**दररोजच्या धर्तीवर (डेली प्रॉडक्ट) बचत खात्यावर व्याज देणे**

कृपया आमच्या गव्हर्नरांनी २१ एप्रिल २००९ रोजी घोषित केलेल्या वार्षिक धोरण निवेदनाच्या परिच्छेद ८८ चा (उतारा सोबत जोडला आहे) संदर्भ घ्यावा. त्यानुसार, एप्रिल १, २०१० पासून, अधिसूचित वाणिज्य बँकांव्दारे बचत खात्यांवरील व्याज डेली प्रॉडक्टच्या धर्तीवर काढले जाईल. विद्यमान मार्गदर्शक तत्वांनुसार १ जुलै २००८ च्या देशांतर्गत, सर्वसाधारण अनिवासी ( एनआरओ) आणि अनिवासी ( बाह्य ) (एनआरई) खात्यांमधील रुपये स्वरुपातील ठेवींवरील महापरिपत्रिकांच्या परिच्छेद २.२ ब अनुसार बँकांना सांगण्यात आले होते की त्यांनी बचत खात्याच्या ठेवीबाबत, त्याच महिन्याच्या १० तारखेपासून महिना अखेरीपर्यंत असलेल्या किमान शिल्लक रकमेवर व्याजाची रक्कम काढावी व ती रु १ किंवा अधिक असल्यासच त्या अनेक बँकांनी सुचविले होते की बचत खात्यावरील व्याज हे प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या पहिल्या तारखेपासून ते शेवटच्या तारखेदरम्यान किमान शिल्लक रकमेवर किंवा डेली प्रॉडक्ट धर्तीवर काढले जावे. ही बाब इंडियन बँक्स असोशिएशन कडे नेण्यात आल्यावर त्यांनी मत दिले की डेली प्रॉडक्ट धर्तीवर व्याज प्रदान करणे हे बँकांमधील संगणकीकरण पूर्ण झाल्यावरच करता येणे शक्य आहे.

२) आम्ही असा सल्ला देत आहोत की, पुनरावलोकन केल्यानंतर, आणि वाणिज्य बँकांच्या शाखांमधील संगणकीकरणाच्या समाधानकारक स्तर पाहता प्रस्तावित केले जात आहे की, **१ एप्रिल २०१०** पासून अधिसूचित वाणिज्य बँकांव्दारे, बचत खात्यावरील व्याज हे डेली प्रॉडक्ट धर्तीवर काढण्यात यावे. हे संक्रमण सुरळीतपणे व्हावे ह्यासाठी बँकांनी ह्याबाबतचे मार्ग-रीती तयार कराव्यात

आपला
**(पी. विजयभास्कर)**
मुख्य महाव्यवस्थापक

सोबत जोडपत्र - वरील प्रमाणे

**भारतीय रिझर्व बँक**
**वार्षिक धोरण निवेदन २००९-१०**
**विभाग ब - विकास व विनियामक धोरण - २००९-१०**

## २) व्याजदार धोरण

### ब) दररोजच्या (डेली प्रॉडक्ट) धर्तीवर बचत खात्यावर व्याजप्रदान

८८) सध्या, बचत खात्यावरील व्याज हे, प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या १० तारखेपासून ते महिन्याच्या १० तारखेपासून ते महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्या खात्यामधील किमान शिल्लक रकमेवर काढले जाते. अनेक बँकांनी सुचविले आहे की बचत खात्यावरील व्याज हे प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या पहिल्या दिवसापासून ते शेवटच्या दिवसापर्यंत त्या खात्यात असलेल्या किमान शिल्लकेवर किंवा डेली प्रॉडक्ट धर्तीवर काढले जावे. ही बाब आयबीएच्या निदर्शनास आणल्यावर त्यांच्या मतानुसार, डेली प्रॉडक्ट धर्तीवर व्याज काढले जाणे हे बँकांमधील संगणकीकरण संपूर्ण झाल्यावरच शक्य होऊ शकते. वाणिज्य बँकांच्या शाखांमधील असलेला संगणीकरणऱ्या समाधानकारक स्तर पाहता असे प्रस्तावित करण्यात येते आहे की -

- एप्रिल १, २०१० पासून अधिसूचित वाणिज्य बँकांव्दारे (एससीबी) काढले जाणारे बचत खात्यांवरील व्याज हे डेली प्रॉडक्ट धर्तीवर काढले जावे.

ह्याबाबतच्या कार्यरीती बँकांशी सल्लामसलत करुन ठरविल्या जातील